ISO 9001:2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
नागरी सुविधा केंद्र,
जा.क्र.नासुके/१/कावि/९८/२०१५
दि.२३/०३/२०१५

**विषय :- महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येणा-या सोयी सुविधाकरिता शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्वीकारणेबाबत...**

**संदर्भ :- १) माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, शासन निर्णय क्र.MH-९०२१/११/२०१३-DIT(MH)-DIT(MH)/३९ दि.१४/०८/२०१३**
**२) परिपत्रक क्र.नासुके/१/कावि/६०९/२०१३ दि.०२/०९/२०१३**
**३) शासन निर्णय क्र.प्रसुधा १६१४/३४५/प्र.क्र.७१/१८-अ दि.०९/०३/२०१५**

**परिपत्रक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रामार्फत नागरिकांना विविध प्रकारचे दाखले / परवाने विहित कालावधीमध्ये उपलब्ध करुन देण्यात येतात. सदर दाखले / परवाने साठी अर्ज, आवश्यक असणारे कागदपत्रे इ. संबंधित विभागांनी निर्धारित केलेली आहेत.

महाराष्ट्र शासनाचे संदर्भ क्र.१ चे निर्णयानुसार संदर्भ क्र.२ चे परिपत्रकान्वये, मनपामार्फत देण्यात येणा-या विविध प्रकारचे दाखले / परवाने मध्ये प्रतिज्ञापत्र दाखल करणे आवश्यक असते अशा सर्व दाखले / परवाने साठी यापुढे अर्जदाराच्या प्रतिज्ञापत्राऐवजी, स्वघोषणापत्राचा समावेश अर्जामध्ये करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

संदर्भ क्र.१ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन सर्व शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादि शासकीय संस्थामध्ये शपथपत्र (Affidavit) ऐवजी स्वयं घोषणापत्र (Self-Declaration) व प्रमाणपत्रे / कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती (Attested copies) ऐवजी स्वयंसाक्षांकित प्रती (Self-Attested copies) स्वीकृत करण्यासंदर्भात कार्यपध्दती स्विकारण्याबाबतचे आदेश दि.०९/०३/२०१५ चे शासन निर्णयान्वये निर्गमित करणेत आलेले आहेत.

सबब दि.०९/०३/२०१५ चे शासन निर्णयाची प्रत सोबत पाठविण्यात येत असून सर्व विभागप्रमुखांनी त्यामध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार महानगरपालिकेकडून नागरिकांना नागरी सुविधा केंद्रामार्फत देण्यात येणा-या विविध प्रकारचे दाखले / परवाने चे अर्जामध्ये शपथपत्र (Affidavit) ऐवजी स्वयं घोषणापत्र (Self-Declaration) व प्रमाणपत्रे / कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती (Attested copies) ऐवजी स्वयंसाक्षांकित प्रती (Self-Attested copies) स्वीकृत करण्याची कार्यवाही प्रस्तावित करावी. स्वघोषणापत्र सोबत जोडलेल्या प्रपत्र **"अ"** प्रमाणे राहील. स्वयंसाक्षाकित प्रतींसह त्यांच्या सत्यतेबाबत स्वघोषणापत्र सोबत जोडलेल्या प्रपत्र **"ब"** प्रमाणे घेण्यात यावे.

**जेथे जेथे विद्यमान कायदा / नियम याव्दारे शपथपत्र / साक्षांकित प्रती अर्जासह सादर करणे आवश्यक आहे तेथे शपथपत्र / साक्षांकित प्रती अर्जासह सादर करणे आवश्यक राहील याची नोंद घ्यावी.**

(राजीव जाधव)
**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

सोबत :- १) संदर्भ क्र.३ चा शासन निर्णय
२) प्रपत्र अ आणि ब

प्रति,
सर्व विभागप्रमुख,
विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

परिपत्रक क्र.नासुके/१/कावि/९८/२०१५ दि.२३/०३/२०१५ चे लगत.

प्रपत्र - अ

**स्वयंघोषणापत्र**

अर्जदाराचा फोटो

मी-------------------------श्री.--------------------------यांचा मुलगा / मुलगी वय-----वर्ष, आधार क्रमांक (असल्यास)---------------- व्यवसाय------------------------------------------ राहणार ------------------------------------यांद्वारे घोषित करतो / करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजूतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि / किंवा संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण:----------------------------

दिनांक:----------------------------

अर्जदाराची सही:--------------------------

अर्जदाराचे नाव:--------------------------

---

प्रपत्र - ब

**स्वयं-साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र**

अर्जदाराचा फोटो

मी-------------------------श्री.--------------------------यांचा मुलगा / मुलगी वय-----वर्ष, आधार क्रमांक (असल्यास)---------------- व्यवसाय------------------------------------------ राहणार ------------------------------------यांद्वारे घोषित करतो / करते की, मी स्वंय साक्षांकीत केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्य प्रती आहेत. त्या खोटया असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि / किंवा संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण:----------------------------

दिनांक:----------------------------

अर्जदाराची सही:--------------------------

अर्जदाराचे नाव:--------------------------

परिपत्रक क्र.नासुके/१/कावि/९८/२०१५ दि.23/०३/२०१५ चे लगत.

Annexure — A

Self-Declaration

Applicant's Photo

I ---------------------------------- Son / Daughter of-------------------------------
aged ---------, occupation---------------resident of------------------------------
with UID No. ----------------------------------------------- hereby declare that the information provided above is true and correct to the best of my personal knowledge, information and belief. I fully understand the consequences of giving false information. If the information is found to be false, I shall be liable for prosecution and punishment under Indian Penal Code and / or any other law applicable thereto.

Place :------------------ Applicant's Signature-------------------

Date :------------------ Applicant's Name :-----------------------

---

Annexure — B

Self-Declaration for Self Attestation

Applicant's Photo

I ---------------------------------- Son / Daughter of-------------------------------
aged ---------, occupation---------------resident of------------------------------
with UID No. ----------------------------------------------- hereby declare that the copies attested by me are true copies of original documents. I am well aware of the fact that if the copies are found to be false, I shall be liable for prosecution and punishment under Indian Penal Code and / or any other law applicable thereto.

Place :------------------ Applicant's Signature-------------------

Date :------------------ Applicant's Name :-----------------------

**शासकीय सोयी /सुविधाकरिता शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारणे.**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः प्रसुधा १६१४/३४५/प्र.क्र.७१/१८-अ**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: ०९ मार्च, २०१५

<u>वाचा :-</u> १) माहिती तंत्रज्ञान, सामान्य प्रशासन विभाग , शासननिर्णय क्र. MH- ९०२१ /११/२०१३ - DIT (MH)/ ३९ दिनांक १४/०८/२०१३.

२) माहिती तंत्रज्ञान, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. MH- ९०२१ /११/२०१३ - DIT (MH)/ ३९ दिनांक १५/१०/२०१३.

<u>प्रस्तावना</u> -

शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था इ. शासकीय संस्थांकडून नागरिकांना विविध अनुज्ञप्ती, दाखला व शासकीय सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. याकरिता अर्जासह विहित नमुन्यातील शपथपत्रे सादर करावी लागतात. तसेच मुळ कागदपत्रांच्या राजपत्रित अधिकारी / विशेष कार्यकारी अधिकारी /इतर सक्षम अधिका-यांनी साक्षांकित केलेल्या प्रती सादर कराव्या लागतात. यामुळे नागरिकांना होणारी असुविधा दूर करण्यासाठी शासकीय कार्यालयांमध्ये शपथपत्र, प्रमाणपत्र तसेच साक्षांकित प्रती ऐवजी शक्य तेथे स्व घोषणा प्रमाणपत्र तसेच स्वयंसाक्षांकित प्रती स्विकृत करण्याची एक कार्यपध्दती अंमलात आणण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

<u>शासन निर्णय</u> -

महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य इत्यादि शासकीय संस्थामध्ये विविध दाखले, अनुज्ञप्ती व इतर शासकीय सेवा / सुविधा प्राप्त करुन घेण्याकरिता नागरिकांना सादर करावे लागणारे शपथपत्र (Affidavit), तसेच मुळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे यांच्या राजपत्रित अधिकारी/ विशेष कार्यकारी अधिकारी इत्यादी. सक्षम अधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेल्या प्रती (Attested copies) सादर कराव्या लागतात. परिणामी नागरिकांची गैरसोय होते. ही गैरसोय दूर करण्याकरिता प्रचलित कार्यपध्दती अधिक सुलभ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

<u>**संदर्भाधीन शासन निर्णय अधिक्रमित करुन सर्व शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य इत्यादि शासकीय संस्थामध्ये शपथपत्र (Affidavit), ऐवजी स्वयं घोषणापत्र (Self Declaration) व प्रमाणपत्रे / कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती (Attested copies) ऐवजी स्वयंसाक्षांकित प्रती ( Self Attested Copies) स्वीकृत करण्या संदर्भात पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत**</u> -

**अ)** <u>**शपथपत्र (Affidavit) ऐवजी स्वयं घोषणा पत्र (Self-Declaration) स्विकारणे -**</u>
शासकीय कामकाज तसेच सेवा/ सुविधांकरिता अनेक शासकीय कार्यालयांकडून अर्जासह शपथ पत्राची मागणी करण्यात येते. जेथे जेथे विद्यमान कायदा/ नियम

याव्दारे शपथपत्र अर्जासह सादर करणे आवश्यक आहे. तेथे शपथ पत्र सादर करणे आवश्यक राहील. मात्र जेथे अशा प्रकारे शपथपत्र बंधनकारक नाही. तेथे शपथ पत्राची मागणी करण्यात येऊ नये. त्या सर्व प्रकरणी शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र (Self Declaration) घेण्यात यावे. स्वघोषणापत्र प्रपत्र -अ॰ प्रमाणे राहील.

**ब)** **<u>मुळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे यांच्या (Attested copies) साक्षांकित प्रतीऐवजी स्वयं साक्षांकित प्रती ( Self Attested Copies) स्वीकारणे</u> :-**

शासकीय कामकाज तसेच शासकीय सेवा / सुविधा करिता अर्जासह मुळ प्रमाणपत्रांच्या/ कागदपत्रांच्या प्रती राजपत्रित अधिकारी / विशेष कार्यकारी अधिकारी /इतर सक्षम अधिका-यांनी साक्षांकित केल्यानंतर स्विकारल्या जातात. जेथे जेथे विद्यमान कायदा / नियम याव्दारे अशा साक्षांकित प्रतींची आवश्यकता आहे. तेथे अशा साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक राहील. मात्र जेथे अशा प्रकारे साक्षांकन बंधनकारक नाही त्या सर्व प्रकरणी स्वयं साक्षांकित प्रती स्विकारण्यात याव्यात. तेथे साक्षांकित प्रतींची मागणी करण्यात येऊ नये. मात्र स्वयंसाक्षांकित प्रतींसह त्यांच्या सत्यतेबाबत स्वघोषणापत्र सोबत जोडलेल्या प्रपत्र - ब प्रमाणे घेण्यात यावे.

**क)** **वरील दोन्ही स्वघोषणापत्रे साध्या कागदावर करता येतील त्याकरिता न्यायिक कागदाची आवश्यकता नाही.**

**ड)** स्वघोषणा प्रमाणपत्रावर नागरिकाने जर चुकीची / खोटी माहिती दिल्यास त्याबाबत संबंधित नागरिकावर भा.दं.वि. मधील तरतूदी तसेच इतर अधिनियमातील तरतूदीनुसार योग्य ती कारवाई केली जाईल, असा स्पष्टपणे उल्लेख विहित नमुन्यातील अर्जामधील अटी व शर्तीमध्ये करण्यात यावा.

**इ)** स्व घोषणा प्रमाणपत्रावर संबंधित नागरिकाचे सुस्पष्ट तसेच अलिकडच्या काळातील छायाचित्र (फोटो) असावे. उपलब्ध असल्यास त्यावर संबंधित नागरिकाचा आधार क्रमांक देखील नमूद करण्यात यावा.

३. <u>नागरी सुविधा केंद्र</u>

**अ)** राज्यातील सर्व नागरीक सुविधा केंद्र, महा-ई-सेवा केंद्र, सेतु केंद्र इ. केंद्रामध्ये वरील परि. २) प्रमाणे स्वघोषणा पत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती व त्यांच्या सत्यतेबाबत स्वघोषणा पत्र स्विकारण्याची कार्यवाही करावी.

**ब)** शपथपत्राऐवजी स्वघोषणा पत्र व स्वयंसाक्षांकितप्रती संदर्भात स्वघोषणा पत्र हे अर्जाचाच भाग राहतील ते साध्या कागदावर घेण्यात यावे त्यासाठी न्यायिक कागदाची आवश्यकता नाही.

**क)** नागरी सुविधा केंद्र महा-ई-सेवा केंद्रामार्फत देण्यात येणा-या सेवांकरिता विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीमध्ये महा ऑनलाइनने आवश्यक त्या सुधारणा कराव्यात व त्याचा अहवाल माहिती तंत्रज्ञान विभागास तात्काळ सादर करावा.

**४.** सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयांना वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश त्वरीत द्यावेत.

**५.** हा शासन निर्णय माहिती व तंत्रज्ञान, सामान्य प्रशासन विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०३०९१८२५००२७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(डॉ. पी. एस. मीना)**
**अपर मुख्य सचिव (प्र.सु. र. व का.)**

प्रत,

१) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद.
२) सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
३) मा. राज्यपालांचे सचिव (५ प्रती),
४) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव (५ प्रती),
५) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
६) संचालक, माहिती तंत्रज्ञान,
७) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
८) मुख्य सचिवांचे वरीष्ठ स्वीय सहायक,
९) *मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
१०) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
११) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
१२) प्रबंधक , लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय,
१३) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१४) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१५) उप सचिव, विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय, विधान भवन, मुंबई,
१६) उप सचिव, राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, मुंबई,
१७) सर्व विभागीय आयुक्त,
१८) सर्व जिल्हाधिकारी,
१९) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२०) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख /
२१) प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती),
२३) निवड नस्ती.

**प्रपत्र-अ**

**स्वयंघोषणापत्र**

| |
|---|
| **अर्जदाराचा फोटो** |

मी-------------------------------श्री. ------------------------------यांचा मुलगा / मुलगी वय----- वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) ----------------------------------------व्यवसाय------------------- राहणार-------------------------------------- याद्वारे घोषित करतो / करते की, वरील सर्व माहिति माझ्या व्यक्तीगत माहिती व समजूतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि / किंवा संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :------------------- अर्जदाराची सही-----------------------

दिनांक :------------------- अर्जदाराचे नाव :-----------------------

## Annexure - A

### Self-Declaration

| Applicant's Photo |
| --- |

I --------------------------------- Son / Daughter of------------------------------ aged ---------, occupation----------------resident of------------------------------ with UID No. -------------------------------------------- hereby declare that the information provided above is true and correct to the best of my personal knowledge, information and belief. I fully understand the consequences of giving false information. If the information is found to be false, I shall be liable for prosecution and punishment under Indian Penal Code and / or any other law applicable thereto.

Place :------------------ Applicant's Signature-------------------

Date :------------------ Applicant's Name :-----------------------

# Annexure - B

## Self-Declaration for Self Attestation

| Applicant◦s Photo |
|---|

I -------------------------------- Son / Daughter of----------------------------- aged ---------, occupation---------------resident of----------------------------- with UID No. ------------------------------------------- hereby declare that the copies attested by me are true copies of original documents. I am well aware of the fact that if the copies are found to be false, I shall be liable for prosecution and punishment under Indian Penal Code and / or any other law applicable thereto.

Place :-----------------   Applicant◦s Signature------------------

Date :-----------------   Applicant◦s Name :----------------------

**प्रपत्र-ब**

**स्वयं-साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र**

| |
|---|
| **अर्जदाराचा फोटो** |

मी-------------------------------श्री. -----------------------------यांचा मुलगा / मुलगी वय----- वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) ---------------------------------------व्यवसाय------------------- राहणार--------------------------------------- याद्वारे घोषित करतो / करते की, मी स्वयं साक्षांकीत केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्य प्रती आहेत. त्या खोटया असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता आणि / किंवा संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :------------------ अर्जदाराची सही------------------------

दिनांक :------------------ अर्जदाराचे नाव :------------------------